**प्रेस नोट** दिनांक. ०२/११/२०२२

**आरोपी लोकसेवक प्रल्हाद संभाजी गिरी, वय ४८ वर्ष, व्यवसाय कनिष्ठ लिपीक, कार्यालय कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, क. २ परभणी, रा. मथुरा नगर, परभणी ( वर्ग—३ ) यांनी २,०००/— रू. लाच मागणी करून १,०००/— रू. स्वत: लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कार्यवाही**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी |
| पोलीस ठाणे | नवामोंढा, परभणी |
| गु.र.नं. व कलम | गु.र.नं. ४३७/२०२२, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | प्रल्हाद संभाजी गिरी, वय ४८ वर्ष, व्यवसाय कनिष्ठ लिपीक, कार्यालय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, क्र. २ परभणी रा. मथुरा नगर, परभणी ( वर्ग—३ ) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/— रू. ( एक हजार रूपये ) |
| थोडक्यात माहीती | यातील तक्रारदार यांनी दि. ०१/११/२०२२ रोजी ला.प्र.वि.कार्यालयात लेखी तक्रार दिली की, तक्रारदार यांच्या मयत वडीलांच्या जागी कालवा चौकीदार म्हणुन अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, क्र. २ परभणी यांचे कार्यालयात अर्ज व प्रस्ताव सादर केला होता. पाटबंधारे कार्यालय, परभणी येथे अनुकंपा धारकांचे कामकाज पाहणारे लिपीक प्रल्हाद गिरी यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलांचे जागेवर कालवा चौकीदार या पदाच्या नोकरीसाठी अनुकंपाच्या प्रस्तावाची फाईल औरंगाबाद कार्यालयात पाठवुन त्याचा पाठपुरावा करून फाईलची मंजुरी मिळवुन घेण्यासाठी त्यांना २,०००/— रू. लाचेची मागणी करत असले बाबत वैगेरे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरून लाप्रवि कार्यालय परभणी यांचेकडुन दि. ०१/११/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये आलोसे प्रल्हाद संभाजी गिरी यांनी तक्रारदार यांना त्यांचे अनुकंपा तत्वावर नियुक्तीचा प्रस्तावाची फाईल औरंगाबाद कार्यालयात पाठवुन त्याचा पाठपुरावा करून फाईलची मंजुरी मिळवुन घेण्यासाठी पंच क्रमांक १ यांचे समक्ष २,०००/— ची लाचेची मागणी केली व तक्रारदार यांचेकडुन १०००/— रुपये लाचेची रक्कम पंच क्रमांक १ यांचे समक्ष कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे क्रमांक २ परभणी कार्यालयाच्या समोरील चहाच्या गाडयाजवळ स्वत: स्विकारली असता ला.प्र.वि. परभणी पथकाने आलोसे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.<br>दि. ०१/११/२०२२ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरून आलोसे प्रल्हाद संभाजी गिरी वय ४८ वर्ष व्यवसाय कनिष्ठ लिपीक रा. मथुरा नगर, परभणी यांचे विरूध्द पोलीस ठाणे नवामोंढा परभणी गु.र.नं. ४३७/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>आलोसे यांना दिनांक ०२/११/२०२२ रोजी मा. विषेश न्यायालय, परभणी येथे हजर केले असता मा. न्यायालयने आलोसे यांना एक दिवस पोलीस कोठडी मंजुर केली आहे. गुन्हयाचा तपास चालु आहे. |

सदरची कार्यवाही मा. डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. श्री धरमसिंह चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री किरण बिडवे, पोलीस निरीक्षक श्री सदानंद वाघमारे, पोह/अनिल कटारे, पोह/चंद्रशेखर निलपत्रेवार, पोशि/अतुल कदम व चापोना/जर्नाधन कदम ला. प्र. वि., परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणाऱ्या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांचेकडून केले आहे.


**दुरध्वनी क्रमांक ०२४५२—२२०५९७ टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड. — ९६२३९९९९४४

श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नांदेड. — ९९२३४१७०७६

श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी. — ७०२०२२४६३१

श्री. सदानंद वाघमारे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी. — ९८२३६१६१४२

श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी. — ९८८११४१२१८